Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401
Accredited by NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… **Date: 03/10/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## व्यासंगी समीक्षक, लेखक म.वा.धोंड



मधुकर वासुदेव धोंड यांचा जन्म ३ ऑक्टोबर १९१४ रोजी मुंबईत झाला. त्यांचे शिक्षण मुंबईत राममोहन हायस्कुल आणि विल्सन महाविद्यालयात झाले. सुरुवातीला १९३७ ते १९४५ या कालखंडात मुंबईच्या चिकित्सक समूहाच्या शिरोळकर हायस्कूलमध्ये ते शिक्षक होते. त्यानंतर त्यांनी शासकीय महाविद्यालयात प्रध्यापकपद स्वीकारले. धारवाडचे कर्नाटक कॉलेज, मुंबईचे इस्माइल युसूफ महाविद्यालय आणि एल्फिस्टन महाविद्यालय यामध्ये ते मराठीचे प्राध्यापक आणि विभागप्रमुख होते. त्यानंतर 'मराठी संशोधन मंडळ' या संस्थेत संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यांचे १९४८ साली 'काव्याची भूषणे' हे त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित झाले.

एखाद्या विषयाचे सामाजिक, राजकीय, तात्त्विक, व्यक्तिगत पैलू तपासून त्याचे विश्लेषण करण्याची धोंड यांची शैली अन्य समीक्षकांहून पूर्ण वेगळी आणि अनोखी मर्मदृष्टी देणारी होती. अर्थात या विश्लेषक वृत्तीतून आणि ज्ञानाच्या अपार जिज्ञासेतूनच त्यांनी समीक्षेची अनेक पुस्तके लिहिली. प्रा. धोंड यांचे 'मराठी लावणी' हे १९५६ साली लावणीच्या इतिहासाचा मागोवा घेणारे शोधपर पुस्तक प्रकाशित झाले. त्यातील विवेचन करताना त्यांनी लावणीचा उगम आणि त्या वेळची राजकीय, सामाजिक आणि धार्मिक स्थिती काय आणि कशी होती याचा तपशीलवार लेखाजोखा घेतला आहे. प्रा. धोंड हे नुसते समीक्षक नव्हते तर ते संशोधकही होते. 'ज्ञानेश्वरी' मधील लौकिक सृष्टीचे मूल्य समजून घेण्यासाठी त्यांनी वनस्पतिशास्त्राचा अभ्यास अत्यंत बारकाईने केला. अत्यंत व्यासंगी असलेल्या प्रा. धोंड यांनी बालकवींची 'औदुंबर', बी. कवींची 'चाफा' ही कविता तर श्री. ज. जोशी यांची 'आंनदी गोपाळ ' आणि 'रघुनाथची बखर' या कादंबऱ्या या सर्वांवरची त्यांची समीक्षा खूपच गाजली. प्रा. म . वा. धोंड यांचे ५ डिसेंबर २००७ रोजी वांद्रे येथे निधन झाले.

Nashik Edition
Oct 03, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401